1. प्लेटोच्या मते ईश्वराच्या कल्पनेतील सत्य कसे असते ?

   अ) कलावंताची प्रतिमा

   ब) कारागिराची वस्तू

   क) परमसत्य

   ड) असत्य

2. ऍरिस्टॉटलला कलावंत हा कोणापेक्षा श्रेष्ठ वाटत होता?

   अ) ईश्वरापेक्षा

   ब) इतिहासकारापेक्षा

   क) वैज्ञानिकापेक्षा

   ड) कारागिरापेक्षा

3. कवितेची निर्मिती कशी होत असते असे वर्डस्वर्थ म्हणतो ?

   अ) हळूहळू

   ब) वेगाने

   क) तात्काळ

   ड) उत्स्फुर्तपणे

4. एडगर ऍलन पो याने कवितेच्या व्याख्येत तिच्या कोणत्या अंगावर भर दिला आहे?

   अ) शाब्दिक

   ब) सांगितीक

   क) भावनिक

   ड) संरचनात्मक

5. आविष्कारवादी कवितेतील सौंदर्याचे स्वरूप कसे आहे असे मानतात ?

   अ)नियंत्रीत

   ब)विलक्षण

   क) विचक्षण

ड) स्वायत्त

6. कोर्टहोपला कवितेची भाषा कशी असावी असे वाटते ?

अ) सुंदर

ब) शास्त्रोक्त

क) छंदोबद्ध

ड) अनाकलनीय

7. "ओल्या पानातल्या रेषा वाचतात ओले पक्षी" या काव्यपंक्तीतील प्रतिमा कोणत्या प्रकारची आहे ?

अ) श्राव्य

ब) चवीची

क) दृष्य

ड) स्पर्श

8. "सारे काही सरले होते ---फक्त हात हाती होते" या काव्यपंक्तीत 'हात' हे कशाचे प्रतीक आहेत ?

अ)जबाबदारीचे

ब) भक्तीचे

क) सोबतीचे

ड) ओदार्याचे

9.प्रथम श्रेणीची कल्पनाशक्ती ही काय घडवणारी शक्ती असते?

अ)निर्मिती

ब) बोधना

क) विकास

ड) प्रगती

10. कलावंत प्रतिभावंत कसा होतो?

अ) योगायोगाने

ब) जन्मतः

क) प्रयत्नाने

ड) वाचनाने

11. अनुकृतीचा सिद्धांत कोणत्या दोन पाश्चात्त्य साहित्यशास्त्रज्ञींनी मांडला आहे ?

अ)सॉक्रेटीस आणि प्लेटो

ब) प्लेटो आणि सोफोक्लीझ

क) सॉक्रेटीस आणि ऍरिस्टॉटल

ड) प्लेटो आणि ऍरिस्टॉटल

12. ऍरिस्टॉटलच्या मते कलावंत एखादा अनुभव कलाकृतीत मांडताना त्यावर कोणती प्रक्रिया करतो ?

अ) अनुभवाचे असत्यीकरण

ब) अनुभवाचे उदात्तीकरण

क) अनुभवाचे साधारणीकरण

ड) अनुभवाचे विकृतीकरण

13. कवीची मनोवृत्ती कविता निर्माण करताना कशी असते असे वर्डस्वर्थ म्हणतो ?

अ) सकारात्मक

ब) नकारात्मक

क) चिंतनशील

ड) संवेदनशील

14. कोर्टहोपने काव्यव्याख्येत कवितेतील विचार आणि भावना कशा असल्या पाहिजेत असे म्हटले आहे ?

अ) स्पष्ट

ब) अस्पष्ट

क) स्वतंत्र

ड) कल्पनारम्य

15."एक गुलाबाची कळी घालते माझ्या नाकात रबराची नळी" या काव्यपंक्तीत गुलाबाची कळी हे कशाचे प्रतीक आहे ?

अ) गुलाबाचे फुल

ब) गुलाबाचा गंध

क) गुलाबाजाम

ड) सुंदर स्त्री

16. कवितेतील रूपके बनताना काय प्रक्रिया होत असते ?

अ) वस्तुतील गुण इंद्रियसंवेद्य बनवले जात असतात

ब) वस्तुतील वैशिष्ट्य प्रचलीत संकेतांतून सांगितली जातात

क) एका वस्तुच्या गुणधर्मांचे दुसऱ्या वस्तुवर आरोपण होते

ड) दोन वस्तुंची तुलना केली जाते

17. केवळ कवितेची सामुग्री एकत्रित करण्याचे कार्य करणारी कवीजवळील शक्ती कोणती असते ?

अ) विश्लेषण शक्ती

ब) प्रतिभा शक्ती

क) चमत्कृती शक्ती

ड) संश्लेषणशक्ती

18. साहित्यावर सामाजिक वास्तवाचे नियंत्रण असते असे म्हणणारी साहित्यशास्त्रज्ञांची भूमिका काणत्या नावाने ओळखली जाते?

अ) स्वायत्तावादी

ब) नैतिकतावादी

क) नियतत्ववादी

ड) आविष्कारवादी

19. मॅथ्यू अर्नोल्डच्या मते साहित्य वाचकांना कोणत्या दिशेने नेते ?

अ) मूलतत्ववादाच्या दिशेने

ब) परिवर्तनाच्या दिशेने

क) परिपूर्णतेच्या दिशेने

ड) आत्मविकासाच्या दिशेने

20. ऍरिस्टॉटलच्या मते शोकांतिका ही कशाप्रकारच्या कर्मांची अनुकृती असते ?

अ) दुःखद

ब) विनोदी

क) गंभीर

21. काही समीक्षकांनी कॅथार्सिसच्या सिद्धांताचा संबंध कोणत्या वैद्यकशास्त्राशी जोडला आहे ?

अ) आयुर्वेद

ब) युनानी वैद्यक

क) होमियोपाथी

ड) नेचरोपाथी

22. रिचर्डसच्या मते कलेमुळे आनंद का मिळतो ?

अ) कारण कला माणसाच्या भावनांचे विरेचन करते

ब) कारण कला माणसाच्या भावनांचे व्यवस्थापन करते

क) कारण कला माणसाच्या भावनाचे विश्लेषण करते

ड) कारण कला माणसाच्या भावनांचे उदात्तीकरण करते

23. प्लेटोचा कलेकडे पाहण्याचा दृष्टिकोन कशाप्रकारचा होता ?

अ) कलावादी

ब) नैतिकतावादी

क) सौंदर्यवादी

ड) वास्तववादी

24. कवी आदर्श राज्यातील नागरिकांना कशापासून दूर नेईल असे प्लेटोला वाटत होते ?

अ) सत्यापासून

ब) जगापासून

क) वासनेपासून

ड) स्वार्थापासून

25. वस्तुतील कोणत्या गोष्टीचा आविष्कार कलेत होत असतो असे ऍरिस्टॉटलने सांगितले आहे ?

अ) मूलद्रव्यांचा

ब)उणिवांचा

क)भौतिकतेचा

ड) सत्वाचा

26. अर्नोल्डच्या काव्यव्याख्येत त्याने कवितेतील शब्द कसे असावेत असे म्हटले आहे ?

अ) सुंदर

ब) आलंकारीक

क) निर्दोष

ड) सामासिक

27. कोर्टहोपच्या मते काव्य काय निर्माण करणारी कला आहे ?

अ) विचार

ब) ज्ञान

क) आनंद

ड) माहिती

28. "शहर नुस्तं बेडकासारखं मख्ख , बथ्थड" या काव्यपंक्तीतील सौंदर्य खालीलपैकी कोणत्या सिद्धांताच्या निकषाने उलगडता येईल ?

अ) नियमोल्लंघन सिद्धांत

ब) अनेकार्थतेचा सिद्धांत

क) अपरिचितीकरणाचा सिद्धांत

ड) भावनासंक्रमणाचा सिद्धांत

29. "आकाशी झेप घेरे पाखरा , सोडी सोन्याचा पिंजरा"  या काव्यपंक्तीतील 'आकाश 'आणि 'पिंजरा' ही  प्रतिके कशाची सूचक आहेत ?

अ) उंची आणि खोली

ब) उडणे आणि बसणे

क) स्वातंत्र्य आणि सुरक्षितता

ड) महत्त्वाकांक्षा आणि धोका

30. शोकांतिकेच्या प्रेक्षकांच्या मनावर होणाऱ्या परिणामाला ऍरिस्टॉटलने काय नाव दिले आहे  ?

अ) हॅमर्शिया

ब) इकाशिया

क) कॅथार्सिस

ड) रिपब्लीक

31ल्युकास या साहित्यशास्त्रज्ञाच्या मते कोणत्या परस्पर विरोधी विशेषांचे दर्शन शोकात्मिकेत घडते ?

अ)प्रामाणिकपणा- लबाडी

ब) स्वार्थ – निरपेक्षता

क) सामर्थ्य – दुबळेपणा

ड) संकुचितता- विशालता

32.रिचर्डसच्या मते साहित्यसमीक्षेच्या मूल्यांचा निकष कोणत्या शास्त्राच्या सांकल्पनिक भाषेत दिला पाहिजे ?

अ) भौतिकशास्त्र

ब) जीवशास्त्र

क) मानसशास्त्र

ड) समाजशास्त्र

३३. जीवनातील कोणत्या प्रकारच्या मूल्यां साहित्यकृतीचा संबंध असला पाहिजे असे मॅथ्यू अर्नोल्डचे मत होते ?

अ) तकलादू

ब) तात्पुरत्या

क) शाश्वत

ड) परिवर्तनशील

34.ऍरिस्टॉटलच्या ग्रंथाचे नाव काय

अ) रिपब्लीक

ब) पोएटिक्स

क) लिरीकल बॅलेडस

ड) रिझन ऑफ प्युअर क्रिटिक

35.डाळिंबीच्या फुलापरी साडी लाल डौलदार, निळया गर्द किनारीची नागमोड मनोहर या कवित्तील प्रतिमा कोणत्या प्रकारच्या आहेत ?

अ) दृष्य

ब) श्राव्य

क) स्पर्श

ड) गंध

36.अन थेंब टपोरे सर्पापरि ते थंड , वेगात धावती फोडुन काळे खंड या काव्यपंक्तीतील प्रतिमा कोणत्या प्रकारच्या आहेत ?

अ) श्राव्य

ब) स्पर्श

क) मनोमय

ड) दृष्य

37.अन तुझ्या करातील उंची शुभ्र सिगार वलयांतून वितरे दर्प तिचा सुकुमार या काव्यपंक्तीतील प्रतिमा कोणत्या प्रकारची आहे ?

अ) श्राव्य

ब) गंध

क) स्पर्श

ड) नाद

३८किलबिलले उजाडताना ओठ उगवतीचा थरथरला या काव्यपंक्तीतील रूपक कोणते ते ओळखा.

अ) उजाडताना किलबिलले

ब) ओठ थरथरला

क) ओठ उगवतीचा

ड) उजाडताना ओठ

३९.पोराबांळाचे लेंढार सांभाळीत सांभाळीत तू सावरलंस माझ्या संसाराचे आभाळ या ओळीतील आभाळ हे कशाचे प्रतीक आहे ?

अ) आकाश

ब) नभ

क) सुरक्षितता

ड) आधार

४०.नियमोल्लंघनाचा सिद्धांत कोणी मांडला आहे ?

अ) मुकारोवस्की

ब) शॅक्लोवस्की

क) टॉलस्टॉय

ड) एम्पसन

४१.भावनासंक्रमणाचा सिद्धांत कोणी मांडला आहे?

अ) कांट

ब) प्लेटो

क) ऍरिस्टॉटल

ड) कोलरिज

४२. सौंदर्य म्हणजे नियमरहित नियमोल्लंघन हे विधान कोणाचे आहे ?

अ) कांट

ब) प्लेटो

क) शॅक्लोवस्की

ड) मुकारोवस्की

४३.विरेचन ही संज्ञा कॅथार्सिससाठी कोणी वापरली आहे ?

अ) श्री.के.क्षिरसागर

ब) प्रभाकर पाध्ये

क) वा.ल. कुलकर्णी

ड) गं.बा, सरदार

४४.कविता म्हणजे 'उत्तम शब्दांची उत्तम रचना' ही काव्यव्याख्या कोणी केली आहे ?

अ) वर्डस्वर्थ

ब) कोलरिज

क) कोर्टहोप

ड) अर्नोल्ड

४५. मॅथ्यु अर्नोल्डने कोणते साहित्यप्रयोजन सांगितले ?

अ) भावनासंक्रमण

ब) सामाजिक बांधिलकी

क) नैतिकता

ड) जीवनभाष्य

४६.प्रेरणा संतुलन सिद्धांत कोणी मांडला ?

अ) कांट

ब) टॉलस्टॉय

क) कोर्टहोप

ड)आय,ए.रिचर्डस

४७. चमत्कृती शक्ती काव्यातील घटकांची जुळणी कशाप्रकारे करते ?

अ) स्वाभाविक

ब) कृत्रिम

क) तार्किक

ड) सेंद्रिय

४८.आविष्कारवाद्यांना कवितेतील कोणती गोष्ट महत्त्वाची वाटते ?

अ) भावना

ब) अनुभव

क) बाह्यरचना

ड) आशय

४९.मी एक मुंगी, तू एक मुंगी या ओळीतील मुंगी हे कशाचे प्रतीक आहे ?

अ) असामान्य माणूस

ब) सामान्य माणूस

क) किटक

ड) एकटेपण

५०."घरट्यातून व्योमातून शापित मी तगमगतो" या ओळींत व्योम हे कशाचे प्रतीक आहे ?

अ) आकाश

ब) स्वप्न

क) कल्पनाशक्ती

ड) महत्त्वाकांक्षा

---------------------------------------------------------------------------------------------